**MHRG090009072019**

| | |
|---|---|
| दाखल दिनांक | : २८/११/२०१९ |
| नोंदणी दिनांक | : २८/११/२०१९ |
| निकाल दिनांक | : १०/०३/२०२६ |
| कालावधी | : वर्ष महिने दिवस<br>०६ ०३ १० |

**फॉर्म नं.XXXII**

**भाग 'अ'**

**(न्यायनिर्णयाचे शिर्ष पान)**

**[फौजदारी मार्गदर्शिका, प्रकरण ६, परिच्छेद ४४(i)]**

**न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, रोहा, जिल्हा–रायगड यांचे न्यायालयात**

**(पिठासीन अधिकारी : सं. वि. खैरे)**

न्यायनिर्णय घोषीत दि.१०/०३/२०२६

**सं. फौ. खटला क्र.४५५/२०१९**

**निशाणी क्र.४०**

गुन्हा नोंद क्र.४५/२०१९, नागोठणे पोलीस ठाणे

| | |
|---|---|
| **अभियोग पक्ष** | महाराष्ट्र शासन<br>नागोठणे पोलीस ठाणे.<br>ता. रोहा, जि. रायगड. |
| **अभियोगपक्षातर्फे विधीज्ञ** | श्री. ए. एल. पवार, विशेष सहा. सरकारी अभियोक्ता. |
| **आरोपी** | **गणपत म–या राणे**<br>वय – ५८ वर्षे, व्यवसाय – नोकरी<br>रा. पाटणसई आदिवासीवाडी,<br>पो. पाटणसई, ता. रोहा, जि. रायगड. |
| **आरोपीतर्फे विधीज्ञ** | श्री. आर. बी. सावंत |

**भाग ब**

**[फौजदारी मार्गदर्शिका, प्रकरण ६, परिच्छेद ४४(ii)अन्वये]**

| | |
|---|---|
| **गुन्हा घडल्याचा दिनांक** | ०१/०७/२०१९ |
| **फिर्याद दाखल दिनांक** | ०६/०७/२०१९ |
| **दोषारोप पत्र दाखल दिनांक** | २८/११/२०१९ |
| **आरोपीस गुन्हयाचा आशय समजावुन सांगितल्याचा दिनांक** | १२/०२/२०२० |
| **पुरावा सुरु झाल्याचा दिनांक** | ०४/०७/२०२२ |
| **न्यायनिर्णय राखुन ठेवल्याचा दिनांक** | १०/०३/२०२६ |
| **न्यायनिर्णय घोषित दिनांक** | १०/०३/२०२६ |
| **शिक्षा दिली असल्यास तो दिनांक** | निरंक. |

**आरोपीचा तपशील**

| आरोपी क्र. | आरोपीचे नाव | अटक केल्याचा दिनांक | जामीनावर सोडल्याचा दिनांक | आरोप केलेला गुन्हा | निर्दोष मुक्तता किंवा दोषी | सुनावण्यात आलेली शिक्षा | फौ.प्र.सं कलम ४२८ नुसार संपरीक्षे दरम्यान आरोपी न्यायबंदी असलेला कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | गणपत म–या राणे | अटक नाही. | – | भारतीय दंड विधान १८६० कलम ३०४–अ, | निर्दोष मुक्तता | – | – |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | २७९, ३३८ व मोटार वाहन कायदा कलम १८४ अन्वये | | | |

## :: न्यायनिर्णय ::

(दिनांक १० मार्च २०२६ रोजी घोषीत)

आरोपीविरूध्द भारतीय दंड विधान १८६० (यापुढे सोयीकरीता संक्षिप्तरित्या भा.दं.वि. असे संबोधण्यात आले आहे.) कलम ३०४–अ, २७९, ३३८ व मोटार वाहन कायदा १९८८ (यापुढे सोयीकरीता संक्षिप्तरित्या मो.वा.का असे संबोधण्यात आले आहे.) कलम १८४ या गुन्ह्यासंबंधी संपरीक्षा चालविण्यात आली आहे.

### अभियोग पक्षाची हकीकत संक्षिप्त स्वरुपात खालीलप्रमाणे आहे.

०२. वर्दीदार मनोज काशिनाथ जाधव याने दि.०२.०७.२०१९ रोजी दिलेल्या अपघाताच्या वर्दीवरुन मोटर अपघात नोंदणी क्र.०८/२०१९ नोंदविण्यात आला होता. त्याने दिलेल्या वर्दीप्रमाणे दि.०१.०७.२०१९ रोजी रात्री १९.४५ वाजेच्या सुमारास तो घरात असताना त्याच्या गावातील राहणारा देविदास तेलंगे याने त्याला घरी येवुन त्याचा चुलता अनंत नारायण जाधव हा कामावरुन सुटल्यानंतर मौजे बाळसई गावचे हद्दीत फणसाचा माळ येथे रोडवरुन चालत येत असताना वांगणी बाजुकडुन जाणा–या मोटारसायकल नोंदणी क्र.एम.एच.०६/बी.वाय.९१४२ वरील मोटारसायकलस्वार म्हणजे आरोपीने त्याला पाठीमागुन येवुन ठोकर मारली व अनंत नारायण जाधव खाली पडला असे सांगितले. सदरचा

अपघात सायंकाळी १९.३० वाजता झाल्याचे आणि अनंत नारायण जाधव यास निलेश पांडुरंग यादव, सनिल चंद्रकांत भिसे आणि पंकज हिराचंद्र दळवी यांनी नागोठणे येथील कोकणे हॉस्पीटल येथे नेल्याचे वर्दीदार मनोज काशिनाथ जाधव यास सांगितल्यामुळे त्याने हॉस्पीटलमध्ये जावुन पाहिले असता अनंत नारायण जाधव याच्या डोक्यातुन रक्त येत होते. त्याला पुढील उपचाराकरीता एम.जी.एम. हॉस्पीटल येथे पाठविण्यात आले. त्यानंतर वर्दीदार मनोज काशिनाथ जाधव याने सदर अपघाताची वर्दी पोलीस ठाण्यात दिली. फिर्यादी पो. ना. पी. एल. मोरे यांनी प्रस्तुत प्रकरणातील अपघाताची चौकशी करुन सदर अपघात आरोपीच्या चुकीमुळे झाल्याचे निष्पन्न झाल्यामुळे त्याने आरोपीविरुध्द फिर्याद दाखल केली. फिर्यादी पो. ना. मोरे यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन आरोपीविरुध्द वर नमुद अपराधांकरीता गु.र.क्र. ४५/२०१९ वर नागोठणे पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आला.

०३. सदर फिर्यादीच्या अनुषंगाने तपासी अधिकारी पो. हवा. बी. जी. मेंगाळ आणि फिर्यादी पो. ना. मोरे यांनी तपास केला. त्यांच्या तपासात आरोपीने गुन्हा केल्याचे निष्पन्न झाल्यामुळे आरोपीविरुद्ध या न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले.

०४. माझे विद्वान पुर्वाधिकारी यांनी नि.क्र.०९ वर आरोपीस भा.दं.वि.कलम २७९, ३३८ व मो.वा.का कलम १८४ या गुन्हयाचा आशय समजावुन सांगितला आहे. परंतु नंतर अनंत नारायण जाधव याचा उपचारादरम्यान मृत्यु झाल्यामुळे नि.क्र.२४ वर आरोपीविरुध्द भा.दं.वि.कलम ३०४–अ अन्वये दोषारोप ठेवण्यात आला आहे. आरोपीने गुन्हा कबुल केला नसल्यामुळे त्याच्या विरुद्ध खटला चालविण्यात आला.

०५. प्रस्तूत प्रकरणात आरोपीविरुद्ध आलेल्या पुराव्याच्या अनुषंगाने त्याला स्पष्टीकरण देण्याची संधी मिळावी म्हणून त्याचे फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ कलम ३१३ अन्वये नि.क्र.३६ वर निवेदन नोंदवीले. आरोपीने अभियोग पक्षातर्फे देण्यात आलेला पुरावा नाकारला असून त्याच्या विरुद्ध खोटी केस केल्याचा बचाव घेतला आहे.

०६. दोन्ही पक्षांचा युक्तिवाद ऐकला. अभियोग पक्षाची हकीकत, त्यांनी अभिलेखावर

आणलेला पुरावा विचारात घेता खालील मुद्दे उपस्थित होत आहेत. त्यांचे निष्कर्ष कारणमिमांसेसहीत पुढील प्रमाणे नोंदवीत आहे.

| मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|
| १. दि. ०१/०७/२०१९ रोजी १९.३० वाजेच्या सुमारास मौजे बाळसई, वाकण–आमडोशी रोडवर, ता. रोहा, जि. रायगड येथे आरोपीने त्याच्या ताब्यातील मोटारसायकल नोंदणी क्र. एम. एच. ०६/बी.वाय.९१४२ हयगयीने, निष्काळजीपणे, भरधाव वेगाने, मानवी जिवीत धोक्यात येईल अगर अन्य व्यक्तीला दुखापत किंवा नुकसान पोहोचेल अशा रितीने चालवुन समोरुन चालत जाणारा अनंत नारायण जाधव यास ठोकर मारुन त्याच्या की जो सदोष मनुष्यवध होत नाही अशा मृत्युस कारणीभुत होवुन भा.दं.वि.कलम ३०४–अ प्रमाणे गुन्हा केल्याचे अभियोग पक्षाने सिध्द केले आहे काय? | .. नाही |
| २. वर नमुद तारीख, वेळी व ठिकाणी आरोपीने त्याच्या ताब्यातील मोटारसायकल नोंदणी क्र. एम. एच. ०६/बी.वाय.९१४२ हयगयीने, निष्काळजीपणे, भरधाव वेगाने, मानवी जिवीत धोक्यात येईल अगर अन्य व्यक्तीला दुखापत किंवा नुकसान पोहोचेल अशा रितीने चालवुन भा.दं.वि.कलम २७९ प्रमाणे गुन्हा केल्याचे अभियोग पक्षाने सिध्द केले आहे काय? | .. नाही |
| ३. वर नमुद तारीख, वेळी व ठिकाणी आरोपी याने त्याच्या ताब्यातील उपरोक्त वाहन मानवी जिवीत किंवा इतरांची व्यक्तीगत सुरक्षितता धोक्यात येईल इतक्या बेदरकारपणे व हयगयीने चालवुन समोरुन चालत जाणारा अनंत नारायण | .. नाही |

जाधव यास गंभीर दुखापत पोहचवून भा.दं.वि.कलम ३३८ प्रमाणे गुन्हा केल्याचे अभियोग पक्षाने सिध्द केले आहे काय?

४. वर नमुद तारीख, वेळी व ठिकाणी आरोपी याने रस्त्याचे स्वरुप, स्थिती व उपयोग आणि त्यावेळी जितकी वाहतुक तेथे प्रत्यक्षपणे असेल किंवा असण्याची वाजवी शक्यता असेल ते प्रमाण, यासह प्रकरणाची सर्व परिस्थिती लक्षात घेता, जनतेस धोकादायक ठरेल अशा वेगाने किंवा अशारितीने त्याच्या ताब्यातील उपरोक्त वाहन चालवुन मो.वा.का. कलम १८४ प्रमाणे गुन्हा केल्याचे अभियोग पक्षाने सिध्द केले आहे काय? .. नाही

५. काय आदेश ? आरोपीस निर्दोष मुक्त करण्यात येत आहे.

## कारणमिमांसा

### मुद्दा क्रमांक ०१ ते ०४ करीता –

०७. मुद्दा क्र.०१ ते ०४ एकमेकांशी संबंधीत असल्यामुळे पुनरावृत्ती टाळण्यासाठी त्यांची कारणमीमांसा एकत्रीतपणे नोंदवीत आहे.

०८. अभियोग पक्षाने प्रस्तुत प्रकरणात एकुण ०६ साक्षीदार तपासले आहेत. वर्दीदार मनोज (सा.क्र.०१) याने त्याच्या सरतपासात तो दि.०२.०४.२०२१ रोजी त्याच्या घरात असताना त्याचा चुलता अनंत जाधव याचा वांगणी–बारशी गावामध्ये अपघात झाल्याचे त्याच्या मुलाने सांगितल्याचे कथन केले आहे. त्याचा काका अनंत जाधव पायी जात असताना आरोपीने त्याच्या मोटारसायकलने अनंत जाधव यास उडविल्याचे त्याला समजल्याचे त्याने सांगितले आहे. त्याने त्याप्रमाणे नि.क्र.१४ वरील वर्दी दिल्याचे कथन केले आहे.

०९. देविदास (सा.क्र.३) याने दि.०१.०७.२०१९ रोजी तो वाकण येथुन त्याच्या गावी मोटारासायकलने येत असताना वाकण–बाळसई रोडवरील फणसाचा माळ येथे सनिल आणि पंकज दळवी त्याला रस्त्यावर उभे असल्याचे दिसले तसेच त्या ठिकाणी त्याच्या गावातील इसम अनंत जाधव खाली पडलेला दिसला असे कथन केले आहे. त्याने अनंत जाधव याच्या डोक्याला मार लागुन रक्त निघत होते आणि तेथे बाजुला मोटारसायकल नोंदणी क्र.एम.एच.०६/९१४२ होती तसेच सनिल व पंकज याच्या बाजुला आरोपी उभा होता असे कथन केले आहे. त्याने पुढे सनिल व पंकज यांना घडलेल्या घटनेबाबत विचारले असता आरोपीच्या गाडीने अनंत जाधवला ठोकर दिल्याचे सांगितल्याचे कथन केले आहे. त्याने त्याच्या उलटतपासात सदर घटना प्रत्यक्ष पाहिली नसल्याचे मान्य केले आहे.

१०. निलेश (सा.क्र.४) याने देखील संध्याकाळी ०७.०० वाजेच्या दरम्यान तो स्कॉर्पीओ गाडीने जात असताना पाऊस येत होता तसेच त्याला वाकण फाट्याच्या पुढे बाळसईच्या दिशेने अपघात झाल्याचे दिसल्यामुळे तो थांबला असे कथन केले आहे. त्याने तेथे सनी भिसे, देविदास (सा.क्र.०३) आणि आरोपी उभा होता व अनंत रामचंद्र जाधव यास कोकणे हॉस्पीटल नागोठणे येथे नेले होते तसेच त्या ठिकाणी जागेवर मोटारसायकल नोंदणी क्र.एम.एच.०६/९१४२ उभी होती असे सांगितले आहे. सदर साक्षीदाराने त्याच्या उलटतपासात घटनास्थळाजवळ लोक जमा झाल्याचे दिसल्यामुळे तो थांबला व त्यावेळी तेथे रात्र होती आणि रस्त्यावर विजेचे दिवे नव्हते असे मान्य केले आहे. त्याने अपघात प्रत्यक्ष बघितला नसल्याचे देखील मान्य केले आहे.

११. हरिश्चंद्र (सा.क्र.२) हा घटनास्थळाचा पंचनामा करताना पंच म्हणुन हजर असलेला साक्षीदार आहे. त्याने त्याच्या सरतपासात घटनास्थळाचा पंचनामा करताना त्या ठिकाणी सनिल भिसे व फिर्यादी पो. हवा. मोरे (सा.क्र.६) हजर होते तसेच वाकण रोडवरुन बाळसईकडे येत असताना रस्त्याच्या डाव्याबाजुला मोटारसायकल नोंदणी क्र.एम.एच.०६/बी.वाय.९१४२ उभी होती व घटनास्थळ सनिल भिसे याने दाखवले असे कथन केले आहे. त्याने त्याप्रमाणे नि.क्र.१५ वरील पंचनामा तयार केल्याचे देखील सांगितले

आहे. त्याने त्याच्या उलटतपासात अपघातस्थळ पक्क्या डांबरी रोडवर आणि साईडपट्टीवर देखील असल्याचे सांगितले आहे. त्याने पंचनाम्यात घटनास्थळ उत्तरेस दोन फुट अंतरावर पक्क्या रोडवर असल्याचे दर्शविल्याचे मान्य केले आहे.

१२. तपासी अधिकारी पो. हवा. मेंगाळ (सा.क्र.५) याने वरिष्ठांच्या आदेशान्वये प्रस्तुत गुन्ह्याचा तपास त्याने स्वतः केल्याचे कथन केले आहे. त्याने आरोपीने वाकण–आमडोशी रस्त्यावरील फणसाचा माळ येथे पादचारी अनंत नारायण जाधव यास मोटारसायकलने ठोकर दिल्याचे व त्यावेळी मागुन येणा–या मोटारसायकलवरील दोन इसम दळवी व भिसे यांना आरोपीने घडलेली हकीकत सांगितल्याचे कथन केले आहे. त्याने अनंत नारायण जाधव याने तीन–चार महिने वैद्यकीय उपचार घेतल्यानंतर तो शुध्दीवर नव्हता तसेच त्याचे निदान न झाल्यामुळे डॉक्टरांनी आवश्यक वैद्यकीय उपचार सांगुन त्याला त्याच्या घरी पाठविले व त्यानंतर काही दिवस घरी उपचार घेतल्यानंतर दि.२१.०१.२०२० रोजी तो मयत झाला असे सांगितले आहे. त्याने त्याच्या तपासात आरोपीने त्याच्या ताब्यातील मोटारसायकल वाहतुक नियमांकडे दुर्लक्ष करुन बेदरकारपणे चालवुन पादचारी अनंत नारायण जाधव यास मागुन धडक देवुन त्याच्या गंभीर दुखापतीस तसेच मृत्युस कारणीभुत झाल्याचे निष्पन्न झाल्यामुळे त्याने आरोपीविरुध्द दोषारोपपत्र दाखल केल्याचे कथन केले आहे. सदर साक्षीदाराने त्याच्या उलटतपासात घटनास्थळ रस्त्याच्या कडेला असलेल्या तीन फुटाच्या साईडपट्टीवर असल्याचे मान्य केले आहे. त्याने नि.क्र.१५ वरील घटनास्थळाच्या पंचनाम्यात घटनास्थळ पक्क्या रोडवर आहे असे नमुद असल्याचे मान्य केले आहे.

१३. फिर्यादी पो. हवा. मोरे (सा.क्र.६) याने त्याच्या सरतपासात अपघाताची चौकशी त्याने स्वतः केली असुन पंचनामा करताना घटनास्थळ सनिल जाधव याने दाखवल्याचे कथन केले आहे. त्याने नि.क्र.३३ वरील फिर्याद दिल्याचे सांगितले आहे. त्याने त्याच्या उलटतपासात घटनास्थळ दाखविणारा सनिल भिसे याने अपघात प्रत्यक्ष पाहिला नव्हता असे मान्य केले आहे.

१४. वर्दीदार मनोज (सा.क्र.१) याने जरी सदर अपघाताची नि.क्र.१४ वरील वर्दी दिली असली तरी त्याने सदर अपघाताबाबत त्याला त्याच्या मुलाने सांगितल्याचे कथन केल्यामुळे तो अपघाताचा प्रत्यक्षदर्शी साक्षीदार नसल्याचे दिसत आहे. देविदास (सा.क्र.३), निलेश (सा.क्र.४) हे देखील अपघात झाल्यानंतर घटनास्थळी आल्याचे त्यांच्या पुराव्यातुन दिसत आहे. त्यामुळे ते देखील अपघाताचे प्रत्यक्षदर्शी साक्षीदार नाही. आरोपीस दोषी ठरविण्यासाठी अभियोगपक्षाने सर्वप्रथम आरोपी स्वतः अपघातास कारणीभुत असणारे वाहन चालवत होता हे सिध्द करणे आवश्यक आहे. उपरोक्त साक्षीदारांनी जरी घटनास्थळी आरोपीस पाहिल्याचे कथन केले असले तरी त्यांनी घटनास्थळी असलेली मोटारसायकल आरोपीची होती किंवा ती मोटारसायकल आरोपी चालवत होता असे सांगितले नसल्यामुळे केवळ आरोपीस घटनास्थळी पाहिले एवढयाच कारणावरुन सदर अपघातास कारणीभुत वाहन आरोपी चालवत होता असे अनुमान काढता येणार नाही.

१५. आरोपीतर्फे विधिज्ञ श्री. आर. बी. सावंत यांनी अपघाताच्या निश्चित स्थळाविषयी देखील अभियोगपक्षाच्या पुराव्यात तफावत असल्यामुळे अभियोगपक्षाचा खटला विश्वासार्ह नसल्याचा युक्तीवाद केला आहे. त्यांच्या युक्तीवादाच्या अनुषंगाने पुराव्याचे अवलोकन केले असता नि.क्र.१५ वरील घटनास्थळाच्या पंचनाम्यात घटनास्थळ हे दक्षिण बाजुला रस्त्याच्या कडेपासुन उत्तरेकडे दोन फुट अंतरावर पक्क्या रोडवर असल्याचे नमुद आहे. घटनास्थळ पंच साक्षीदार हरिश्चंद्र (सा.क्र.२) याने त्याच्या उलटतपासात घटनास्थळ पक्क्या डांबरी रोडवर असल्याचे मान्य केले आहे, परंतु नंतर स्वतःहुन घटनास्थळ रोडच्या साईडपट्टीवर असल्याचे सांगितले आहे. तपासी अधिकारी पो. हवा. मेंगाळ (सा.क्र.५) याने देखील त्याच्या उलटतपासात घटनास्थळ पक्क्या डांबरी रोडवर असल्याचे मान्य केले आहे, परंतु नंतर स्वतःहुन घटनास्थळ रोडच्या साईडपट्टीवर असल्याचे सांगितले आहे. नि.क्र.१५ च्या पंचनाम्यासोबत जोडलेल्या घटनास्थळाच्या नकाशात घटनास्थळ हे रोडवर असल्याचे दाखविले आहे. पंच साक्षीदार हरिश्चंद्र (सा.क्र.२) व तपासी अधिकारी पो. हवा. मेंगाळ (सा.क्र.५) या दोघांनी घटनास्थळ रोडवर व साईडपट्टीवर दोन्ही ठिकाणी असल्याचे सांगितले

असले तरी पंचनाम्यातील नमुद वस्तुस्थिती वरुन घटनास्थळ हे दक्षिणेकडील साईडपट्टीपासुन उत्तरेकडे दोन फुट अंतरावर पक्क्या रस्त्यावर असल्याचे दिसत आहे. असे असतानाही सदर दोन्ही साक्षीदार निश्चितपणे घटनास्थळाविषयी सांगत नसल्यामुळे सदर घटनास्थळाचा पंचनामा त्यांनी केला होता किंवा घटनास्थळ त्या ठिकाणी होते याविषयी शंका उपस्थित होत आहे. सदर पंचनाम्यात रस्त्याच्या दोन फुटाच्या साईडपट्ट्या पुर्व व पश्चिम दिशेस असल्याचे नमुद केले आहे. परंतु सोबत जोडलेल्या नकाशात साईडपट्ट्या रस्त्याच्या उत्तर व दक्षिण दिशेला असल्याचे दिसत आहे, ही बाब देखील सदर पंचनाम्याची विश्वासार्हता कमी करणारी आहे. सर्वात महत्वाचे म्हणजे ज्या सनिल भिसे याने घटनास्थळ दाखवले तो अपघाताचा प्रत्यक्षदर्शी साक्षीदार नसल्याचे फिर्यादी पो. हवा. मोरे (सा.क्र.६) याने मान्य केल्यामुळे त्याच्या सांगण्यावरुन दाखविलेली अपघात झाल्याची जागा हे तेच घटनास्थळ असल्याचे अनुमान काढणे सुरक्षित वाटत नाही. अशाप्रकारे अभियोग पक्षाचा पुरावा आरोपीस दोषी ठरविण्याइतपत विश्वासार्ह व पर्याप्त नाही. सबब, अभियोग पक्ष आरोपीविरुद्ध गुन्हा शाबीत करण्यास अपयशी ठरला असल्याने मी मुद्दा क्र.०१ ते ०४ चा निष्कर्ष नकारार्थी नोंदवीत आहे.

**<u>मुद्दा क्रमांक ०५ करीता –</u>**

१६. वरील चर्चेवरुन स्पष्ट होते की, भा.दं.वि.कलम ३०४–अ, २७९, ३३८ व मो.वा.का कलम १८४ या अपराधांच्या सिद्धतेकरीता आवश्यक असणा–या घटकांची परिपुर्ती अभियोग पक्षास करता आली नाही. त्यामुळे आरोपी निर्दोष मुक्ततेस पात्र आहे. सबब, मी मुद्दा क्र. ०५ च्या उत्तरार्थ खालील आदेश पारीत करीत आहे.

## <u>आदेश</u>

०१. आरोपी **गणपत म–या राणे** यास फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ कलम २५५(१) अन्वये भारतीय दंड विधान १८६० कलम ३०४–अ, २७९, ३३८ व मोटर वाहन कायदा १९८८ कलम १८४ या गुन्ह्यातून निर्दोष मुक्त करण्यात

येत आहे.

०२. आरोपीने पुर्वी सादर केलेले वैयक्तीक व जामीनदाराचे बंधपत्र रद्द करुन जामीनदारास बंधपत्रातून मुक्त करण्यात येत आहे.

०३. आरोपीने फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम ४३७–अ चे पुर्ततेकरीता प्रत्येकी रक्कम रुपये १५,०००/– चे वैयक्तीक बंधपत्र ठेवढ्याच रक्कमेच्या लायक जामीनासहीत सादर करावे.

न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषीत..

SANDEEP VISHNU KHAIRE
Digitally signed by SANDEEP VISHNU KHAIRE
Date: 2026.03.11 11:09:49 +0530

स्थळ : रोहा. (सं. वि. खैरे)

दिनांकः १०.०३.२०२६. न्याय दंडाधिकारी प्रथम वर्ग, रोहा.

## भाग क

## [फौजदारी मार्गदर्शिका, प्रकरण ६, परिच्छेद ४४(iii) अन्वये]

## अभियोग पक्ष, बचाव पक्ष व न्यायालयीन साक्षीदारांची यादी

**अ.अभियोग पक्ष :-**

| अ.क्र | साक्षीदाराचे नाव | स्वरुप | निशाणी |
|---|---|---|---|
| ०१. | मनोज काशिनाथ जाधव | वर्दीदार | ०९ लगत |
| ०२. | हरिश्चंद्र लक्ष्मण तेलंगे | घटनास्थळ पंच | ०९ लगत |
| ०३. | देविदास पांडुरंग तेलंगे | साक्षीदार | ०९ लगत |
| ०४. | निलेश पांडुरंग यादव | साक्षीदार | ०९ लगत |
| ०५. | पो. हवा. बी. जी. मेंगाळ | फिर्यादी व तपासी अधिकारी | ०९ लगत |
| ०६. | पो.हवा. पी. एल. मोरे | तपासी अधिकारी | ३२ |

**ब. बचाव पक्षाचे साक्षीदार असल्यास :-**

| अ.क्र. | साक्षीदाराचे नाव | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| | निरंक. | निरंक. |

**क. न्यायालयीन साक्षीदार असल्यास :-**

| अ.क्र. | साक्षीदाराचे नाव | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| | निरंक. | निरंक. |

## अभियोग पक्ष, बचाव पक्ष व न्यायालयीन निशाण्यांची यादी

**अ.अभियोग पक्ष :-**

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|

| | | |
|---|---|---|
| ०१. | अ.सा.क्र. ०१/१४ | अपघाताची वर्दी |
| ०२. | अ.सा.क्र. ०२/१५ | घटनास्थळ पंचनामा |
| ०३. | अ.सा.क्र. ०६/३३ | फिर्याद |

**ब. बचाव पक्ष :-**

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | स्वरूप |
|---|---|---|
| – | निरंक | निरंक |

**क. न्यायालयीन निशाणी :-**

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | स्वरूप |
|---|---|---|
| – | | |

**ड. भौतिक वस्तू :–**

| अ.क्र. | भौतिक वस्तू क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| – | निरंक | निरंक |

SANDEEP VISHNU KHAIRE

Digitally signed by SANDEEP VISHNU KHAIRE
Date: 2026.03.11 11:09:57 +0530

स्थळ : रोहा. (सं. वि. खैरे)

दिनांकः १०.०३.२०२६. न्याय दंडाधिकारी प्रथम वर्ग, रोहा.

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this PDF file order are same word to word as per the original Judgment or Order.

| | | |
|---|---|---|
| Name of the stenographer | :- | Shri. A. A. Nakhawa,<br>Stenographer Grade -III. |
| Name of the Court | :- | C.J.J.D. & J.M.F.C. Roha, |
| Judgment / Order dictated on | :- | 10/03/2026. |
| Judgment / Order delivered on | :- | 10/03/2026. |
| Judgment / Order signed on | :- | 10/03/2026. |
| Judgment / Order uploaded on | :- | 11/03/2026. |